DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021



आतील पानांत

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लसीकरणासाठी विशेष मोहीम राबवावी लागणार - राजेश टोपे

महापालिका परिक्षेत्रातील रस्त्यांवरील खड्डयांबाबत २९६ तक्रारीची नोंद

हि ॲलर्जी कशासाठी ?

अग्रलेख / 5

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ




भिवंडी वैभव
विशेष

➤➤पान ५ वर

भारतीय सौर दिनांक कार्तिक २९ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक ५५ | गुरुवार २१ ऑक्टोबर २०२१ | पाने ६ | रु. ४ | संपादक : मिलिन्द बल्लाळ

# हे बोल घेवड्यांचे सरकार; ओबीसींची दिशाभूल केली

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची टीका

**ठाणे : राज्यातील ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचे मारेकरी महाविकास आघाडी सरकारच आहे. महाविकास आघाडी सरकार हे बोलघेवड्यांचे सरकार आहे. दररोज खोटं बोल, पण रेटून बोल, अशा पद्धतीने मंत्र्यांकडून वक्तव्य केली जात आहेत, अशा शब्दात विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडी सरकारवर हल्ला चढविला.**

**'मंत्र्यांचे कोणीही ऐकत नाही' ओबीसींच्या हितासाठी भाजपने सुरु केलेल्या अनेक योजना महाविकास आघाडी सरकारने बंद केल्या. ओबीसीवरील अन्यायाबाबत महाविकास आघाडीमधील मंत्री गप्प आहेत. त्यांच्याकडून खासगीत 'आमचे म्हणणे कोणीही ऐकत नाही', अशी व्यथा सांगितली जात असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**

ओबीसी जागर अभियानाचा आज ठाण्यात समारोप करण्यात आला. त्या वेळी घेण्यात आलेल्या मेळाव्यात देवेंद्र फडणवीस बोलत होते. या वेळी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील, आमदार संजय केळकर, किसन कथोरे, निरंजन डावखरे, कुमार आयलानी, गणपत गायकवाड, प्रशांत ठाकूर, संजय

➤➤पान २ वर



(छाया- गजानन हरिमकर

## थोडक्यात

### ठेकेदारांच्या प्रलंबित देयकांचा दुसरा हप्ता लवकरच

**ठाणे:** ठाणे महानगरपालिकेच्या वतीने 31 मार्च 2020 पर्यंतच्या प्राप्त देयकांच्या रकमेचा 25 टक्केचा दुसरा हप्ता वितरित करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी घेतला आहे.

यासंदर्भात महापालिकेच्या ठेकेदारांची थकित बिले देण्यासंदर्भात पालकमंत्री एकनाथ शिंदे तसेच महापौर नरेश म्हस्के यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर प्रलंबित देयकांचा दुसरा हप्ता वितरित करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला

➤➤पान २ वर

### डीजी ठाण्याच्या बिलांची होणार चौकशी

**ठाणे:** डी जी ठाण्याच्या माध्यमातून झालेल्या कामांच्या बिलावर कोणी स्वाक्षरी केली असा सवाल उपस्थित करीत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी सदस्यांनी केली. अखेर या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश महापौर नरेश म्हस्के यांनी दिले.

बुधवारी झालेल्या महासभेत शिवसेना नगरसेवक अशोक वैती यांनी या मुद्याला हात घातला. डीजी ठाण्याच्या कामकाज संपुष्टात येत आहे.

➤➤पान २ वर

### तीन प्रभागांमध्ये कोरोनाचे शून्य रुग्ण

**ठाणे:** शहरातील नवीन कोरोना रुग्णांची संख्या किंचित वाढली आहे. आज 55 रुग्ण सापडले आहेत तर 70जण कोरोनामुक्त झाले आहेत. एक रुग्ण दगावला आहे तर तीन प्रभागात एकाही रुग्णाची नोंद नाही. नौपाडा-कोपरी प्रभाग समिती येथे प्रथमच शून्य रुग्ण नोंदवला गेला आहे.

महापालिकेच्या प्रभाग समिती क्षेत्रात रुग्णसंख्या कमी होत आहे. सर्वांत जास्त 13जण माजिवडे-मानपाडा

➤➤पान २ वर

## मुंब्र्यात ५०० जणांकडे १० कोटींची वीजबिल थकबाकी

### कठोर कारवाईचा टोरंटचा इशारा



**ठाणे:** थकीत वीज बिल वसुलीसाठी सगळीकडे राज्यात जोरदार प्रयत्न सुरु असताना मुंब्रा परिसरात जवळपास 500 जणांनी वीज बिलाची 10 कोटीच्या आसपास रक्कम थकवली असल्याचे उघड झाले आहे.

मार्च 2020 पासून कळवा-मुंब्रा- दिवा परिसराच्या वीज पुरवठा व वितरणाची जबाबदारी महावितरणने फ्रँचाईझी म्हणून टोरंट पॉवर कंपनीकडे सोपवली आहे.

कोरोनाच्या लाटेमुळे लादलेले निर्बंध आता काहीसे शिथील होत असताना राज्यात सगळीकडे वीज बिल वसुलीचे काम जोरात सुरु झाले आहे. वारंवार सूचना देऊनही मुंब्रा परिसरात 450 ते 500 असे ग्राहक आहेत, जे लोक वीज नियमित वापरत असूनही त्याचे बिल मात्र भरत नाहीत. यांची एकत्रित थकबाकी 10 कोटींच्या घरात पोचली आहे. यात काही बड्या असामी देखील असून टोरंट कंपनीने अशा ग्राहकांची यादी तयार केली आहे. थकीत वीज बिल भरावे यासाठी ग्राहकांना वारंवार सूचना दिल्या जात असून वीज बिल वसुलीसाठी यापुढे कोणाचीही गय केली जाणार नाही असे कंपनीच्या सूत्रानी सांगितले.

या ग्राहकांना कंपनीकडून एक अंतिम सूचना दिली जाईल, आणि बिल भरणा न झाल्यास त्यांच्यावर कंपनीकडून कठोर कारवाई केली जाईल असेही

➤➤पान २ वर

## प्राधिकरणांचे अधिकारी सुटले; ठामपाचे अधिकारी भरडले

### खड्डयांप्रकरणी सर्वपक्षीय नगरसेवकांचा संताप

**ठाणे:**खड्ड्यांवरुन कारवाई झालेल्या चार अभियंत्यांना पुन्हा सेवेत घेण्याची मागणी सर्वपक्षीय लोकप्रतिनिंधीनी केली. हे खड्डे त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेरचे असतानाही त्यांच्यावर कारवाई झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या निलंबित अभियंत्यांना पुन्हा सेवेत घेण्याचा मार्ग आजच्या महासभेत मोकळा झाला आहे.

कार्यक्षेत्राबाहेर खड्डे असतानाही अभियंत्यांना का निलंबित करण्यात आले? ज्या अधिकाऱ्यांचा संबंध नव्हता, त्यांच्यावर कारवाई का झाली? असे प्रश्न राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नगरसेवक



हणमंत जगदाळे यांनी उपस्थित केले. भाजपचे नगरसेवक मिलिंद पाटणकर यांनी ते रस्ते कोणाचे होते, कोणत्या कारणासाठी अभियंत्यावर कारवाई झाली, ठेकेदाराला वर्क ऑर्डर केव्हा दिली, ठेकेदार दोषी नव्हता का? असे सवाल उपस्थित केले. नजीब मुल्ला यांनी देखील ज्या रस्त्यांवर

➤➤पान २ वर

**बिटकॉनच्या माध्यमातून शहराच्या विविध भागात रस्ते दुरुस्ती, स्मार्टसिटीची कामे सुरु आहेत. 30 ते 35 टक्के कमी दराने ही कामे केलेली आहेत. परंतु त्यातही अनेक कामे बंद ठेवलेली आहेत. त्यामुळे या सर्व कामांचा आढावा अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी सादर करावा असे आदेश महापौर नरेश म्हस्के यांनी दिले.**

## मध्य रेल्वेकडून सहा महिन्यात ७१ कोटींचा दंड वसूल

**ठाणे:** मध्य रेल्वेने मोठ्या प्रमाणावर तिकीट तपासणी मोहीम राबवली असून एप्रिल ते सप्टेंबर 2021 पर्यंत 71.25 कोटी रुपयांचे महसुली नुकसान वाचवून अनियमित प्रवासाची 12.47 लाख प्रकरणे शोधण्यात आली. मध्य रेल्वेत कोविड-19 च्या संबधित योग्य वर्तनाचे पालन न केल्याबद्दल 25,610 व्यक्तींना शोधून दंड करण्यात आला.

मध्य रेल्वेने, सरकारच्या निर्देशांनुसार कोविड -19 प्रोटोकॉलचे पालन करताना आणि प्रवाशांना प्रवास करताना सर्व खबरदारी घेण्यास संवेदनशील बनवण्यासाठी, चुकीने वागणाऱ्या प्रवाशाला दंड देण्यास अतिशय तत्पर आणि कुशलतेने काम करीत आहे.

1 एप्रिल 2021 ते 30 सप्टेंबर 2021 या कालावधीत उपनगरीय

➤➤पान २ वर



**एकीकडे विद्यार्थ्यांचे लसीकरण सुरु करण्यात आले असून दुसरीकडे लोकांच्या शरीरात अँटीबॉडीज तयार होत आहेत. त्यामुळे तब्बल पावणे दोन वर्षांनी बुधवारी सुरु झालेल्या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले.** (छाया- गजानन हरिमकर



(छाया- गजानन हरिमकर

## लस सर्वसामान्यांची, नाही कोणाच्या बापाची

### ठामपा मुख्यालयाबाहेर कॉंग्रेसची घोषणाबाजी

**ठाणे:** ठाण्यात लसीकरणावरुन शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये सुरु असलेल्या वादात आता कॉंग्रेसनेही उडी घेतली आहे. लसीकरणाचे राजकारण थांबवा या मागणीसाठी बुधवारी शहर कॉंग्रेसच्या वतीने महापालिका मुख्यालयाबाहेर धरणे आंदोलन करण्यात आले.

कळव्यात लसीकरण मोहीमेवरुन शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये वाद निर्माण होऊन थेट महापालिकेतच हा संघर्ष

➤➤पान २ वर

## पुरेशी संधी देऊनही छायाचित्रे न दिल्याने मतदारांची नावे वगळली

**ठाणे:** कळवा-मुंब्रा विधानसभा मतदार संघातील 10 हजार 637 मतदारांची नावे पुरेसा वेळ आणि संधी देऊनही छायाचित्रे न दिल्याने वगळण्यात आल्याचा खुलासा मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी केला आहे.

मुंब्रा कळवा विधानसभा मतदारसंघ क्रमांक 149 मध्ये एकूण 3 लाख 69 हजार 176 इतके मतदार आहेत. त्यापैकी छायाचित्र नसलेल्या मतदारांची संख्या 10 हजार 692 आहे. भारत निवडणूक आयोग तसेच मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे वेळोवेळी दिलेल्या व प्राप्त निर्देशांप्रमाणे मतदार नोंदणी अधिकारी यांच्या मार्फत मतदारयादी शुध्दीकरण व अद्ययावतीकरणाची प्रक्रीया करण्यात येते.

➤➤पान २ वर

### महापालिकेचा 'लेट लतीफ' कारभार : आमदार निरंजन डावखरे यांची टीका

## आता रंगायतनला दुरुस्तीचे नाटक !

**ठाणे :** कोरोनाच्या दुसऱ्या लाटेनंतर मराठी नाट्यप्रेमींकडून नाट्यगृहे उघडण्याची वाट पाहिली जात असतानाच, ठाणे महापालिकेच्या 'लेट लतीफ' कारभारामुळे गडकरी रंगायतनमध्ये 22 ऑक्टोबरला नाटकाची तिसरी घंटा वाजणारच नाही, अशी टीका भाजपाचे आमदार व जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे यांनी केली आहे.

राज्य सरकारने कोरोनाचे निर्बंध शिथिल केल्यानंतर 22 ऑक्टोबरपासून राज्यातील नाट्यगृहे व मल्टिप्लेक्स पुन्हा सुरु होत आहेत. त्यामुळे मराठी नाट्यरसिकांना पुन्हा नाटक पाहण्याची ओढ निर्माण झाली आहे. ठाणे शहराचे



सांस्कृतिक प्रतीक म्हणून गडकरी रंगायतनची ओळख आहे. ठाणेकरांची नाटक पाहण्यासाठी पहिली पसंती गडकरी रंगायतनलाच असते. मात्र, आता नाट्यगृह सुरु होत असतानाच गडकरी रंगायतनचा पडदा महिनाभर उघडणार नाही व तिसरी घंटाही वाजणार नाही. ठाणे महापालिकेने गडकरी रंगायतनच्या दुरुस्तीचे काम काढले असून, ते आणखी महिनाभर सुरु राहणार आहे. त्यामुळे गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही दिवाळी पहाटच्या कार्यक्रमांबरोबरच रसिकांना नाटकालाही मुकावे लागेल.

यापूर्वी नाट्यगृहे बंद असताना महापालिकेने दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याची अपेक्षा होती. मात्र, आता नाट्यगृह सुरु होण्यापूर्वी गडकरी रंगायतनची दुरुस्ती करण्याचे काम सुरु केले आहे. महापालिकेच्या या कारभाराचा उगागच नाट्यरसिकांना फटका बसणार आहे. महापालिकेतील सत्ताधारी मराठी माणूस व मराठी संस्कृतीच्या पोकळ गप्पा मारत मारतात. मात्र, त्यांना मराठी नाट्य रसिकांविषयी आस्था नसल्याचेच या प्रकारातून उघड झाले आहे, अशी टीका आमदार निरंजन डावखरे यांनी केली आहे.

**राज्यात विविध घटकांना केव्हाच सवलत देणाऱ्या महाविकास आघाडी सरकारने मुळातच नाट्यगृहावरील निर्बंध खुले करण्यास विलंब केला. त्याविरोधात कलावंतांनी आंदोलन छेडले. तर भाजपाने रेटा वाढविल्याने राज्य सरकारला जाग आली आणि नाट्यगृह खुले करण्याचा मुहूर्त ठरला. पण ठाणे महापालिकेच्या लेट लतिफमुळे ठाणेकरांची उपेक्षा संपलेली नाही, असे श्री. डावखरे यांनी सांगितले.**



# यंत्रांच्या धडधडीने मासेमारी संकटात

## वाशी खाडीवरील नवीन पुलाच्या बांधकामाचा परिणाम

**नवी मुंबई :** वाशी खाडीवर सध्या तिसऱ्या पुलाचे काम जोरात सुरू आहे. मोठमोठी यंत्रे दिवसरात्र धडधडत असल्याने या परिसरातील मासे गायब झाल्याची व्यथा येथील मच्छीमार व्यक्त करीत आहेत. त्यामुळे आमच्यावर आर्थिक संकट आले असून शासनाने पुनर्वसन पॅकेज जाहीर करावे अशी मागणीही त्यांनी केली आहे. आधीच कंपन्यांचे रसायनयुक्त पाणी खाडीत सोडल्याने मासेमारीवर परिणाम झाला होता. आता या पुलाच्या बांधकामामुळे जाळ्यात मासेच सापडत नसल्याचे मच्छीमारांचे म्हणणे आहे.



मुंबई नवीमुंबई शहराला जोडण्यासाठी 1976 साली वाशी खाडीवर पहिला पूल उभारला. मात्र वाहतुकीवर ताण वाढत राहिल्याने दुसऱ्या पुलाचीही उभारणी करण्यात आली. त्यानंतर रेल्वे मार्ग जोडण्यासाठी रेल्वे पूल उभारण्यात आला. तरीही येथील वाहतूक वाढल्याने पुलावर वाहनांचा भार वाढत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या सतत निर्माण होत होती. त्यामुळे आता तिसऱ्या खाडी पुलाचे काम सुरु करण्यात आले आहे. सध्या हे काम जोरात सुरू असून यासाठी मोठमोठी यंत्रे दिवसरात्र धडधडत आहेत. त्यामुळे खाडी किनारी प्रजननासाठी येणारे मासे या परिसरात फिरकत नाहीत. प्रजननच होत नसल्याने मत्स्य उत्पादनावरही त्याचा परिणाम झाला आहे. त्यामुळे मच्छीमारांना मोकळया हाताने परतावे लागत आहे.

नवी मुंबईतील मूळ गावांतील ग्रामस्थ आजही मासेमारीवर आपला उदरनिर्वाह करीत आहेत. मात्र मासेच मिळत नसल्याने त्यांच्यावर उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने येथील मच्छीमारांना पुनर्वसन पॅकेज देत आर्थिक मदत करावी अशी मागणी होत आहे.

### 35 ते 40 टक्के घट

**वाशी खाडीत खेकडे, कोळंबी, मांदेली असे छोटे मासे मिळतात. रसायनयुक्त पाण्यामुळे आधीच मासेमारीत घट झाली होती. त्यात आता पुलाचे बांधकाम सुरू असल्याने यंत्रांची धडधड, गाळ, तेल यामुळे मासे मिळणे कमी झाले आहेत.पूर्वीपेक्षा मासेमारीत 35 ते 40 टक्के घट झाली आहे. त्यातही निवडक मासेच मिळत आहेत. नवीन पूल बांधकामामुळे मासे सापडत नाहीत. खाडी किंवा समुद्र किनारी नवीन प्रकल्प राबवताना त्या ठिकाणी मत्स्य व्यवसायावर अवलंबून असलेल्या विविध घटकाला नुकसानभरपाई दिली पाहिजे. भूमी अधिग्रहण कायदा व नियम 2013 नुसार भरपाई मिळाली पाहिजे, यासाठी आम्ही मागणी केली आहे. ही मागणी मान्य न केल्यास आंदोलन करण्यात येईल.**

# उल्हासनगरात डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न ऐरणीवर



**उल्हासनगर :** खडी खदान येथील डम्पिंग ग्राऊंड ओव्हरफ्लो झाल्याने, कचऱ्याची गाडी खाली करण्यास जास्तीचा वेळ जात आहे. तसेच ऐन दिवाळी तोंडावर आली असतानाही नियमित कचरा उचलला जात नसल्याने, कचरा कुंड्या ओव्हरप्लो होऊन दुर्गंधी पसरली आहे. याबाबत उपायुक्त सुभाष जाधव व मुख्य स्वच्छता निरीक्षक विनोद केणी यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

उल्हासनगरातील कचरा नियमित उचलला जात नसल्याने, कचऱ्याच्या कुंड्या ओव्हरफ्लो होऊन दुर्गंधी पसरली आहे. गेल्या आठवड्यात आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ सुभाष जाधव यांनी मुख्य स्वच्छता निरीक्षक विनोद केणी यांच्यासह स्थानिक आरोग्य निरीक्षक, मुकादम यांच्या सोबत काही भागाची पाहणी केली. यावेळी ओव्हरफ्लो झालेल्या कचरा कुंड्यां बाबत जाब विचारून कारवाई करण्याचे संकेत दिले होते. दरम्यान कॅम्प नं-5 येथील खडी खदान डम्पिंग ग्राऊंड ओव्हरफ्लो होत असून डम्पिंग पायथ्याशी चिखल निर्माण झाला आहे. कचऱ्याच्या गाड्या, डंपर खाली करण्यास कामगारांना जास्तीचा वेळ लागत आहे. याचा परिणाम कचरा नियमित व वेळेवर उचलला जात नसल्याने, कचरा कुंड्या ओव्हरफ्लो झाल्याचे चित्र शहरात निर्माण झाले आहे.

ऐन दिवाळी तोंडावर आली असतानाच कचरा उचलण्यासाठी महापालिकेला मोठ्या अडथळ्यांना पार करावे लागत आहे. अशीच परिस्थिती दिवाळी सणादरम्यान राहिल्यास, शहरात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. गायकवाड पाडा परिसरातील डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याचे सफाटिकरण करणे गरजेचे झाले असून महापालिका निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेनेचे उपशहरप्रमुख व लढा कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप गायकवाड यांनी महापालिकेच्या धोरणावर टीका करून डम्पिंग वरील कचऱ्याचे सपाटीकरण करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. तसेच महापालिकेने वेळीच निर्णय घेतला नाही तर, शहरावर कचऱ्याचे मोठे संकट उभे राहण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

## अनुभव नसताना यंत्रावर कामाला लावले, कामगाराची तीन बोटे तुटली

**मीरारोड :** यंत्रावर कामाचा अनुभव नसताना देखील स्टील वाटी बनवणाऱ्या यंत्रावर कामास लावलेल्या कामगारांची तीन बोटे तुटल्या प्रकरणी भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिसांनी दोघं कंपनी भागीदारांवर गुन्हा दाखल केला आहे. मोहम्मद रबानी शेख हा अकुशल कामगार भाईंदर पूर्वेच्या गणेश इंडस्ट्रीयल इस्टेट मधील हिरेन मेटल ह्या स्टीलच्या कंपनीत कामास होता. यंत्रावर कामाचा अनुभव नसतानाही 21 सप्टेंबर रोजी स्टील वाटी बनविण्याच्या प्रेसिंग मशीन वर कामास लावले होते. हे काम जमणार नाही सांगून देखील त्याला काम करण्यास भाग पाडले.

काम करताना यंत्रात उजव्या हाताची तीन बोटे अडकून तुटली व रक्त वाहू लागले. शेख जोरजोरात ओरडू लागला. जोराने आरडाओरडा करू लागला. त्याला खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तो पुन्हा 5 ऑक्टोबर रोजी कामावर गेला व लहान सहन कामे करू लागला. परंतु कंपनीचे भागीदार नरेश शाह व हिरेन शाह या दोघांनी शेख याला तुझे तू बघून घे , या पुढे उपचारचे आम्ही बघणार नाही असे सांगितल्यावर शेख याने नवघर पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी नरेश शाह व हिरेन शाह वर 12 ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केला आहे.

# कामगारांचे स्मार्टवॉच मनगटाऐवजी पिशवीत ! ठेकेदारांकडून गैरवापर

**नवी मुंबई :** कामचुकार, वेळकाढूपणा करणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांवर एका ठिकाणी बसून लक्ष ठेवता यावे यासाठी कोट्यवधी रुपये खर्चून त्यांच्या मनगटावर महापालिका प्रशासनाने स्मार्ट वॉच बांधले. मात्र नव्याचे नऊ दिवस होताच ती घड्याळे आता मनगटाऐवजी पिशवीत ठेवली जात आहेत. यावर नियंत्रण राहिले नसल्याने त्यांचा आता गैरवापर सुरू आहे.

सन 2019 मध्ये जियो फेन्सिंग यंत्रणेअंतर्गत ही स्मार्ट मनगटी घड्याळ योजना पालिकेने आणली आहे. मात्र ही यंत्रणा आता निकामी ठरत आहे. मध्यंतरी दुरुस्तीअभावी त्यांचा वापर कमी झाला होता. आता गैरवापर सुरू आहे. त्यामुळे या प्रणालीवर नियमित नियंत्रण ठेवण्यासाठी नियंत्रण कक्ष कार्यान्वियित करण्याची मागणी होत आहे. सन 2019 मध्ये तत्कालीन आयुक्त रामस्वामी एन यांनी ही स्मार्ट वॉचची योजना आणली. पालिकेतील कंत्राटी कर्मचारी तसेच अधिकारी यांच्याकडून अचूक व वेळेत काम करून घेण्यासाठी तसेच कामचुकारपणा करणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. 11 कोटी खर्च करून ही प्रणाली सुरु करण्यात आली. टप्प्याटप्प्यात सर्व महापालिका कर्मचारी, अधिकारी यांच्या मनगटावर हे घड्याळ दिसणार होते. मात्र सुरुवातीला सफाई



कर्मचारी आणि घनकचरा विभागात हे घड्याळ देण्यात आले. त्यानुसार कर्मचाऱ्यांचे मानधन दिले जात होते. मात्र मुख्यालयात याचे कटाक्षाने नियंत्रण होत नसल्याने याचा कर्मचारी व ठेकेदारांनी गैरफायदा घेणे सुरु केले. कर्मचारी कामावर हजर आहे की नाही, कामाच्या क्षेत्राबाहेर गेले आहेत का? याची माहिती उपलब्ध होत आहे. तसेच ठेकेदारांनी यावर एक शक्कल लढविली असून कर्मचारी गैरहजर असतानाही त्यांची ही स्मार्ट घड्याळे कामाच्या ठिकाणी एका पिशवीत ठेवली जात आहेत. त्यामुळे गैरहजर असतानाही त्यांचा पगार मिळत असून तो लाटला जात आहे. ही महापालिकेची आर्थिक लुबाडणूक होत आहे. दोन वर्षांतच या घड्याळांचा असा गैरवापर सुरु झाला असून त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहेत. आता दुरुस्तीचा भुर्दंडही प्रशासनाला सहन करावा लागत आहे. प्रति घड्याळ महिन्याला 315 रुपये इतका देखभाल खर्च आहे.

स्मार्ट घड्याळ प्रणाली सुरु आहे. परंतु झोपडपट्टी भागात किंवा टॉवरमध्ये काही ठिकाणी नेटवर्क येत नाही. त्यामुळे अडचणी येत असल्याचे घनकचरा व्यवस्थापनाचे प्रमुख बाळासाहेब राजळे यांनी सांगितले. तसेच ठेकेदारांनी यावर एक शक्कल लढविली असून कर्मचारी गैरहजर असतानाही त्यांची ही स्मार्ट घड्याळे कामाच्या ठिकाणी एका पिशवीत ठेवली जात आहेत. त्यामुळे गैरहजर असतानाही त्यांचा पगार मिळत असून तो लाटला जात आहे. ही महापालिकेची आर्थिक लुबाडणूक होत आहे. दोन वर्षांतच या घड्याळांचा असा गैरवापर सुरु झाला असून त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहेत. आता दुरुस्तीचा भुर्दंडही प्रशासनाला सहन करावा लागत आहे. प्रति घड्याळ महिन्याला 315 रुपये इतका देखभाल खर्च आहे.

## भीक मागून पोट भरणाऱ्या मुलांची हेलिकॉप्टर सफर

**वसई :** भीक मागून आपले पोट भरणाऱ्या दोन लहान मुलांना आकाश ठेंगणे झाल्यासारखे वाटत होते. स्वप्नवत अशी अवकाश भरारी त्यांनी घेतली. नालासोपाऱ्यातील एका तरुणाने त्यांना हेलिकॉप्टर सफर घडवली आणि आकाशाइतकाच विस्तारलेला आनंद भरभरून दिला. यश माने असे या तरुणाचे नाव असून त्याने स्वखर्चाने हा आगळावेगळा अनुभव मुलांना दिला.

यश माने हा नालासोपारामधील रहिवासी असून एक सामाजिक कार्यकर्तादेखील आहे. नालासोपाऱ्यामधील रवी वेलपट्टी (6), अंजली मोडेम (7) या दोन मुलांनी त्याच्याकडे हेलिकॉप्टरमध्ये बसण्याची



इच्छा व्यक्त केली आणि यशने ती पूर्णही केली. ही मुले नालासोपारा पश्चिम स्थानक परिसरातील एका फुटपाथवर राहतात. शुक्रवारी दुपारच्या सुमारास मुंबईच्या विलेपार्ले येथून मुंबईसह वसई-विरार, ठाणे या परिसराचे दर्शन या मुलांनी हेलिकॉप्टरमध्ये बसून घेतले. यशने याआधी देखील गरीब मुलांना हेलिकॉप्टरमधून सफर घडविली आहे.



## तांबे, पितळेच्या वस्तूंच्या किमतीत वाढ

**वाशी :** भांडी बाजारात वेगवेगळ्या धातूंच्या भांड्याच्या किमती वाढल्या असून मोडीच्या दरातही वाढ झाली आहे. कोरोनाचा संसर्ग वाढल्याने चीनकडून निर्यात होणाऱ्या वेगवेगळ्या उत्पादनांवर बंदी घालण्यात आली आहे. त्यातच अफगाणिस्तानातील राजकीय घडामोडींचा परिणाम वेगवेगळ्या क्षेत्रांवर जाणवू लागला आहे.

भांड्यांसाठी लागणारे तांबे, पितळ, स्टील, अन्य धातूंच्या आयातीवर परिणाम होत असल्याने भांड्यासह अन्य उत्पादनांचे दर वाढले आहेत. सध्या चीन आणि अफगाणिस्तानमधून धातूंची निर्यात थांबल्याचा परिणाम भांड्याच्या दरावर झाला आहे. सध्या चातुर्मास सुरु असल्याने पूजाअर्चा करताना, अन्य शुभ कार्यक्रमांतही तांबे, पितळ्याची भांडी वापरली जातात. तर काही वेळा ही भांडी दान म्हणूनही दिली जातात. आता मंदिरेही उघडली आहेत. देवळात देण्यासाठी घंटा, तांब्याचा कळस असा नवस काही जणांकडून केला जातो. त्यासाठीही ही भांडी लागत असल्याचे अरुण पाटील या विक्रेत्याने सांगितले.

# कल्याणमध्ये महावितरणची धडक कारवाई

**डोंबिवली :** कल्याणमधील कृषी उत्पन्न बाजार समिती इमारतीच्या छतावर असलेल्या मोबाईल टॉवरसाठी फिडर पिलरमधून थेट वीज चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यात गेल्या सहा महिन्यांत 56 हजार 150 युनिट वीज वापरल्याचे उघड झाले असून याप्रकरणी मे. सुयोग टेलेमॅटिक्स विरुद्ध महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



महावितरणचे सहायक अभियंता मोहम्मद आरिफ खान, विलास गायकवाड यांच्या पथकाने 8 ऑक्टोबर रोजी बाजार समितीच्या सी क टाईप इमारतीच्या छतावरील मोबाईल टॉवरच्या वीजपुरवठ्याची तपासणी केली. या ठिकणी अधिकृत वीजजोडणी न घेता विनामीटर थेट वीजवापर होत असल्याचे पथकास आढळून आले.

18 मेपासून कंपनीने सहा महिन्यांत आठ लाख 19 हजार रुपये किमतीची वीजचोरी केली आहे. याबद्दल वीजचोरीचे देयक व दंड भरण्याबावत सुयोग टेलेमॅटिक्सला नोटीस बजावण्यात आली होती; मात्र कंपनीने रक्कम भरली नसल्याने त्यांच्याविरुद्ध महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दिवाळीपूर्वी कल्याणमधील पूरग्रस्तांना मदत मिळणार

**डोंबिवली :** अतिवृष्टीमुळे 22 जुलैला कल्याण तालुक्यातील गावांना पुराचा फटका बसला. 15 हजारापेक्षा जास्त नागरिक या पुरात बाधित झाले. त्यातील पाच हजार बाधितांना आत्तापर्यंत सरकारी मदतीचे वाटप करण्यात आले आहे; मात्र 9 हजार बाधित मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांना येत्या 10 दिवसांत मदतीचे वाटप करण्यात येईल.

दिवाळीपूर्वी सर्व बाधितांना मदत मिळवून देण्यात येईल. अशी माहिती कल्याणचे तहसीलदार विजय पाटील यांनी दिली. जुलै महिन्यात तालुक्यातील कल्याण, कल्याण अप्पर कल्याण, टिटवाळा, म्हारळ बुद्रुक, नडगाव, ठाकुर्ली असे सहा सर्कल येत असून यातील सुमारे 15 ते 16 हजाराच्या आसपास नागरिक पुराने बाधित झाले होते. बाधित नागरिकांसाठी राज्य सरकारने मदत जाहीर केली असून त्याचे वाटपही सुरु झाले आहे. कल्याण तालुक्यातील बाधित कुटुंबासाठी प्रत्येकी दहा हजार रुपये अशी 16 कोटी 36 लाख रुपयांची



मदत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळाली आहे.

आत्तापर्यंत 5 हजार बाधितांना या अनुदानाचे वाटप करण्यात आले असून 9 ते 10 हजाराच्या आसपास नागरिकांना वाटप होणे बाकी आहे. त्यांनाही दिवाळीपूर्वी मदत पोहचवण्यात येईल, असे तहसीलदार पाटील यांनी सांगितले.

## सानपाड्यातील एकाच इमारतीत सहा घरफोड्या

**नवी मुंबई :** सानपाडा सेक्टर 5 मधील पांडुरंग व्हिला इमारतीत सहा घरातील लॅपटॉपसह 11 मोबाईल व इतर किमती ऐवज चोरण्यात आल्याचे उघडकीस आले आहे.

सानपाड्यातील इमारतीत सोमवारी पहाटे चोरटे घुसले होते. त्यांनी पहिल्या मजल्यावरील 2, तिसऱ्या मजल्यावरील 2 आणि चौथ्या मजल्यावरील 2 अशा सहा घरामध्ये स्लायडिंग खिडकीवाटे प्रवेश करून मोबाईल व इतर किमतीचा ऐवज चोरला. पहिल्या मजल्यावर चोरट्यांनी नारायण परशुराम पाटील (60) व सूरज सुरेश पाटील यांच्या घरातील मोबाईल चोरले. तसेच तिसऱ्या मजल्यावर चोरट्यांनी अशरफ गफूर मुकादम (46), व दुसऱ्या मजल्यावरील घरातूनही मोबाईल व इतर वस्तू चोरल्या.

तर चौथ्या मजल्यावर कमलेश मोरे यांच्या घरातील लॅपटॉप व मोबाईल तसेच त्यांच्या शेजारी राहणाऱ्या प्रशांत सिंग (27), आशिषकुमार यादव (21), विकास कुमार सिंग (26) या तिघांचे मोबाईल चोरले. सर्व रहिवाशांनी सानपाडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यावर पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# नवी मुंबईत मतदार यादीचा पुनरीक्षण कार्यक्रम

**सानपाडा :** नवी मुंबई पालिकेच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने 1 नोव्हेंबर पासून छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम होणार आहे.

बेलापूर, ऐरोली, कळवा-मुंब्रा मतदारसंघातील याद्या निर्दोष राहण्यासाठी मतदार केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी राजकीय पक्षांनी प्रतिनिधी नेमावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी कोकण भवनमध्ये केले. एक जानेवारी 2021 रोजी वयाची 18 वर्षे पूर्ण केलेल्या युवा मतदारांची नोंद नवीन मतदार यादीत होत नाही तसेच अनेक नवीन मतदारांचे ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर त्यांची छाननी होते आणि एपिक नंबर देखील दिला जातो मात्र तरी देखील त्यांचे अर्ज नाकारण्यात येत असल्याचे नवी मुंबई काँग्रेसच्या वाशी ब्लॉकचे अध्यक्ष सचिन अरविंद नाईक यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले.



# उल्हासनगरात शौचालयाला दरवाजेच नाहीत; नागरिकांवर छत्र्या घेऊन बसण्याची वेळ

**उल्हासनगर :** महापालिकेने लाखो रुपये खर्चून उभारलेल्या शौचालयाला दरवाजेच नसल्यानं नागरिकांवर चक्क छत्र्या घेऊन शौचाला बसण्याची वेळ आलीये. मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या उल्हासनगर शहरात हा धक्कादायक प्रकार समोर आलाय.

उल्हासनगर शहरातील कॅम्प-2 परिसरात हनुमान नगर हा झोपडपट्टी परिसर आहे. या परिसरात महापालिकेने काही वर्षांपूर्वीच लेखी रुपये खर्चून महिला आणि पुरुषांसाठी सार्वजनिक शौचालय उभारलं. मात्र, या शौचालयाचे दरवाजे काही दिवसातच तुटले, तर काही चोरीला गेले. त्यामुळे इथल्या रहिवाशांनी स्थानिक नगरसेवकांपासून ते महापालिकेपर्यंत सगळीकडे तक्रारी केल्या. मात्र, त्याचा काहीही उपयोग झाला नाही. त्यामुळे इथल्या नागरिकांना आता दरवाजांअभावी चक्क छत्री घेऊन शौचाला बसावं लागतंय.

दररोज सकाळी इथले नागरिक एका हातात पाण्याचा डबा, तर दुसऱ्या हातात छत्री घेऊन शौचाला जातात. धक्कादायक बाब म्हणजे पुरुष आणि महिला अशा दोन्ही शौचालयांची हीच अवस्था आहे. या सगळ्याबाबत आम्ही उल्हासनगर महापालिकेची प्रतिक्रियाही जाणून घेतली. उल्हासनगर महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी युवराज भदाणे यांना याबाबत विचारलं असता, ते या सगळ्याबाबत अनभिज्ञ असल्याचं निदर्शनास आलं. त्यामुळे तुम्ही सांगताय तसं जर असेल,



तर तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संबंधित शौचालयाची दुरुस्ती केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यामुळे महापालिकेला शहरातल्या शौचालयाला दरवाजेच नसल्याची बाबही माहीत नसावी, ही शोकांतिका असल्याचं मत व्यक्त होतंय.

मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या शहरातली ही अवस्था पाहिल्यानंतर हे शहर नक्की भारतात आहे? की एखाद्या गरीब देशात आहे? असा प्रश्न नक्कीच पडतो. सुमारे 800 कोटींच्या घरात बजेट असलेली ही महापालिका साधे शौचालयांना दरवाजे बसवून देऊ शकत नसेल आणि लोकांना छत्र्या घेऊन शौचालयात बसावं लागत असेल, तर ही परिस्थिती नक्कीच गंभीर म्हणावी लागेल. त्यामुळं आता उल्हासनगर शहरावरही 'टॉयलेट एक प्रेमकथा'सारखा चित्रपट आल्यावर राज्यकर्ते जागे होतात का? हे पाहावं लागेल.

# विशेष मुलांच्या शाळांनी पेलले करोनाचे आव्हान !

**ठाणे :** कोरोना संसर्गकाळात शाळा बंद असल्या तरी ऑनलाइन प्रणालीद्वारे सर्वसाधारण विद्यार्थ्यांचा अभ्यास सुरु होता. विशेष मुलांना तशा कोणत्याही सुविधेचा लाभ घेणे शक्यच नव्हते. त्यामुळे समाजातील या घटकातील वर्गाला सुविधा देणारी अनेक केंद्रे बंद काळातही पुरेशी काळजी घेत सुरु ठेवावी लागली. तसेच, संचारबंदी काळात बंद करण्यात आलेली काही केंद्रे पालकांच्या आग्रहाखातर संस्थाचालकांना बंदीच्या काळातही सुरु करावी लागली. त्यामुळे मुलांना आणि त्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळाला.

मुरबाड तालुक्यातील शिरवली येथील तारांगण या मतिमंद मुलांच्या निवासी कार्यशाळेत विविध वयोगटातील 20 मुले आहेत. करोना संसर्ग काळातही येथील शिक्षकांनी मुलांची काळजी घेतली.



या कार्यशाळेत सकाळी साडेसहापासून मुलांना दिनक्रम सुरु होतो. करोना संसर्गकाळात इतर सर्व प्रशिक्षण केंद्रे बंद असताना पालकांच्या आग्रहामुळे गेल्या सप्टेंबर महिन्यात शिक्षकांनी हे केंद्र सुरु केले. तीन शिक्षक, तीन काळजी वाहक, एक स्वयंपाकी आणि एक अधीक्षक असे आठजण या केंद्रात मुलांची काळजी घेतात. काही स्वयंसेवी संस्था, दानशूर व्यक्ती या प्रशिक्षण केंद्रासाठी स्वेच्छेने मदत करीत असल्याची माहिती संस्थेचे विकास म्हारसे आणि संकेत पडवळ यांनी दिली. मुलुंड येथील स्वरश्री प्रतिष्ठान ही संस्था अंध, अपंग कलावंतांना घेऊन आनंदयात्री हा वाद्यवृंदाचा कार्यक्रम करते. त्यामुळे रसिकांचे मनोरंजन होऊन मुलांना चरितार्थासाठी चार पैसे मिळतात. करोनाकाळात त्यांना कार्यक्रम मिळणे बंद झाले. त्यामुळे संस्थेने मुलुंडमध्ये एक कराओके क्लब सुरु केला आहे. तिथे अनेक हौशी गायक गाण्याची हौस भागविण्यासाठी येतात. त्यातून काही प्रमाणात का होईना उत्पन्न मिळू लागले आहे.

ठाण्यातील सोबती संस्थेचा वाडा तालुक्यातील तिळसा येथील निवासी प्रकल्प ऑगस्ट महिन्यापासून सुरु झाला. पूर्वी संस्थेतील विद्यार्थी आठवड्यातून पाच दिवस निवासी प्रकल्पात आणि दोन दिवस घरी राहत होते. आता सलग तीन आठवडे निवासी प्रकल्पात राहतात. संस्थेमध्ये सध्या 19 मुले असली तरी सध्या 11 मुले या सुविधेचा लाभ घेतात. खोणी येथील अमेय पालक संस्थेच्या घरकुलातही करोनाकाळात विशेष मुलांची विशेष काळजी घेऊन देखभाल करण्यात आली. बदलापूरजवळील 'आधार'मध्येही तशीच परिस्थिती होती. बाहेरील भेटी बंद करून आम्ही मुलांना दीड वर्ष विलगीकरणात ठेवले. करोनाच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन केले. आता सर्व मुले आणि कर्मचाऱ्यांना लशीच्या दोन्ही मात्रा दिल्या आहेत, अशी माहिती संचालक विश्वास गोरे यांनी दिली.

### अंबरनाथमध्ये पुनर्वसन केंद्र

**अंबरनाथ शहरात पालिकेच्या वतीने गेल्या एप्रिल महिन्यापासून अपंग आणि विशेष मुलांसाठी आधार पुनर्वसन केंद्र सुरू करण्यात आले आहे. पालिकेत नोंद असलेल्या आठशे अपंग-विशेष व्यक्तींना ही सुविधा विनामूल्य उपलब्ध आहे. चिखलोली येथील सर्योदय नगरमधील या केंद्राचा सध्या ७० हून अधिक गरजू नियमित लाभ घेत आहेत. त्यांना घरातून केंद्रात येण्या-जाण्यासाठी घरपोच सुविधाही देण्यात आली आहे. या केंद्रात फिजिओ थेरेपी, ऑक्युपेशनल थेरेपी, न्युरो वैद्यकीय सेवा, आयुर्वेदिक डॉक्टर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. केंद्रात निरनिराळी खेळणी, यंत्रणा असून त्याचा अपंगांना लाभ होत आहे. अपंगांना अशा प्रकारची सुविधा देणारी अंबरनाथ ही राज्यातील पहिली पालिका आहे.**

# भिवंडी वैभव

५ ठाणे, गुरुवार, २१ ऑक्टोबर २०२१ | संपादक - मिलिन्द बल्लाळ निवासी संपादक - पंढरीनाथ कुंभार | www.thanevaibhav.in


आम्हा घरी धन | शब्दांचीच रत्ने |
शब्दांचीच शस्त्रे | यत्ने करु ||

## ही ॲलर्जी कशासाठी?

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला सोबत घेऊन भाजपा जुना मित्र शिवसेनेला यांना शह दे ई ल असे बोलले जात असले तरी स्थानिक परिस्थिती त्यास अनुकूल असेलच असे नाही. कल्याण-डोंबिवली भागातून मनसेचे विधानसभेत प्रतिनिधित्व करणारे आ. राजू पाटील यांनी अशा संभाव्य युतीवर फुल्ली मारली आहे. त्यांच्या मते कल्याण-डोंबिवली शहरांची वाताहात होण्यात सेना आणि भाजपा तेवढेच जबाबदार आहेत. भाजपाबद्दल आ. पाटील यांनी घेतलेल्या भुमिकेमुळे मनसे स्वबळावरच मतदारंसमोर जाणार हे स्पष्ट होते. दरम्यान माजी आमदार कांती कोळी यांच्या शोकसभेत प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांनी स्वबळाची भाषा सोडून आगामी निवडणुकीत महाविकास आघाडी सुरू राहील असे सूचित केले आहे. कोणत्याही परिस्थितीत भाजपाला दूर ठेवण्यासाठी महाविकास आघाडीचा प्रयोग सुरू ठेवावा लागेल असे त्यांना वाटत आहे. ही भूमिका पक्षाने आतापर्यंत घेतलेल्या भूमिकेशी विसंगत आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉँग्रेसला हे बरोबर घेत नाहीत अशी नाराजी कॉँग्रेसच्या काही वरिष्ठ नेत्यांनी यापूर्वी व्यक्त केली होती. मुळात युती वा आघाडीचा विषय एखाद्या नेत्याने व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेवरून ठरत नसतो. त्यामागे पुढचा-मागचा बराच विचार असतो. त्यामुळे कल्याण-डोंबिवलीत मनसे-भाजपा एकत्र आले तर जसे आश्चर्य वाटू नये तसेच महाविकास आघाडी बारगळली म्हणून भुवया उचंवण्याची गरज नाही.

मुळात मनसे आणि भाजपा यांना एकमेकांच्या साथीची प्रचंड निकड आहे. राष्ट्रीय पक्ष आहे असा दावा करून मनसेला झिडकारणे भाजपाला परवडणारे नाही. स्थानिक निवडणुकीत स्थानिक प्रश्न असतात, स्थानिक अस्मितेचा मुद्दा असतो, स्थानिक नेटवर्किंग असते आणि पुढील निवडणुका जिंकण्याकरिता सुरूवातीलाच अपशकुन टाळण्याचीही गरज असते. सेना आणि भाजपा या दोघांवर आ. पाटील यांचा आक्षेप असणे आपण समजू शकतो, परंतु त्यामुळे परिस्थितीत फरक पडणार आहे काय? मनसेला जनतेला खरोखरीच न्याय द्यायचा असेल तर त्यांना एकट्याच्या बहुमत मिळवावे लागेल, असे सत्तांतर करण्याची त्यांची ताकद असेल तर प्रश्न नाही. परंतु तुर्तास त्यांना मनाजोगे काम करता यावे याकरिता कोणाशीतरी हातमिळवणी करावीच लागणार.

सत्तेवर असणाऱ्या पक्षाला जनतेच्या रोशास सामोरे जावे लागत असतेच, अशा वेळी विरोधकांची एकजुट असेल तर मतविभागणी टळू शकते. मनसे त्यादृष्टीने विचार करण्याची शक्यता आहे.

## शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू



भिवंडी: भिवंडी पालिकेतील कर्मचारी व शिक्षकांना दिवाळीची गोड भेट म्हणून सातवा वेतन लागू करण्याची घोषणा पालिकेच्या महापौर प्रतिभा पाटील यांनी केल्यामुळे कर्मचारी व शिक्षक वर्गामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

शिक्षक संघटनेच्यावतीने महापौर प्रतिभा पाटील यांची भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आभार मानण्याचा कार्यक्रम बुधवारी दुपारी झाला.

राज्य शासनाने जानेवारी 2016 पासून कर्मचारी व अधिकारी यांना सातवा वेतन आयोग लागू केला आहे, परंतु भिवंडी पालिकेत काम करणाऱ्या कर्मचारी व शिक्षक वर्गाला सातवा वेतन आयोग लागू न झाल्याने भारतीय कामगार कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष भानुदास भसाळे व शिक्षण मंडळाचे माजी सभापती राजू गाजेंगी यांनी शिक्षक संघटनेच्यावतीने लेखी निवेदन देऊन तातडीने सातवा वेतन आयोग लागू करण्यात यावा, अशी मागणी केली होती. अखेर महापौर प्रतिभा पाटील यांनी पालिका आयुक्त प्रशासन व गटनेते नगरसेवकांशी चर्चा करून पालिका कर्मचारी व शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू केल्याची घोषणा केली.त्यामुळे शिक्षक संघटनेचे प्रमुख व शिक्षण मंडळाचे माजी सभापती राजू गाजेंगी, शिक्षक सेनेचे अरुण भोईर, उपेंद्र संभारी, कृष्णा गाजेंगी, सागर भोईर, नरेंद्र गुज्जा, नबील मोमीन, नासिर शेख आदी शिक्षक संघटनेचे पदाधिकारी व शिक्षकांनी महापौर प्रतिभा पाटील, गटनेते विलास पाटील यांची भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आभार मानले आहेत.

## वैद्यकीय अधिकारी कारभारी खरात यांचा महानगरपालिकेतर्फे सन्मान



**भिवंडी: कोरोनाच्या काळात पालिकेतर्फे डॉ.कारभारी खरात यांनी शहरात अतिशय चांगल्या पद्धतीने काम केले, शासनाकडून कोरोना बाबत आलेल्या सर्व नियम, व मार्गदर्शन तसेच कोरोना हॉस्पिटल सुरु करणे, सर्व वैद्यकीय सेवा चांगल्या सुरु ठेवल्या आहेत यासर्व कामाची दखल घेत महापालिकेच्या वतीने महासभेत वैद्यकीय अधिकारी डॉ.कारभारी खरात यांचा सन्मान करण्यात आला.**

डॉ.कारभारी यांनी केलेल्या चांगल्या कामाची दखल घेऊन राज्यपाल महोदय यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला होता. याची दखल महापौर प्रतिभा पाटील यांनी तातडीने घेतली व वैद्यकीय अधिकारी कारभारी खरात यांचा सत्कार करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार महासभेत महापौरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आयुक्त सुधाकर देशमुख, उपमहापौर इम्रान वली मोहमद खान, मुख्यालय उपायुक्त दीपक पुजारी स्थायी समिती सभापती संजय म्हात्रे, सभागृह नेता विकास निकम, कोणार्क विकास आघाडीचे गटनेते विलास आर.पाटील, भारतीय काँग्रेस आयचे गटनेते हलीम अन्सारी, नगरसेवक संतोष शेट्टी, प्रशांत लाड, अरुण राऊत, श्याम अगरवाल, मलिक मोमीन, मदन नाईक, मनोज काटेकर यांनी वैद्यकीय अधिकारी खरात यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी सभागृहात नगरसेवक, अधिकारी वर्ग सभागृहात उपस्थित होते. शासनाकडून आलेल्या सर्व नियम, व मार्गदर्शन सूचना याचे तंतोतंत पालन केले. विविध ठिकाणी लसीकरण केंद्र सुरु केली. कोरोना हॉस्पिटल सुरु करणे, सर्वत्र लसीकरण व्यवस्था, सर्व वैद्यकीय सेवा चांगल्या सुरु ठेवल्या आहेत यासर्व गोष्टींची दखल घेत महापालिकेच्या वतीने आज झालेल्या महासभेत सन्मान करण्यात आला.

## शांताबाई शेळके जन्मशताब्दीनिमित्त गाण्यांचा कार्यक्रम



भिवंडी: वाचन मंदिर भिवंडीतर्फे शारदीय प्रबोधन माला याचे आयोजन करण्यात येते. यावर्षी दुसरे पुष्प प्रसिद्ध गीतकार शांता शेळके यांच्या जन्मशाब्दीचे औचित्य साधून शांता शेळके यांच्या विविध निवडक गाण्यांचे सादरीकरण करण्यात आले.

शांता शेळके यांनी लिहलेली गजानना श्री गणराया, ही चाल तुरतुरु ही गाणी कुमारी कस्तुरी पालये हिन सादर करून सर्वांची वाहवा मिळवली. तर कुमार समीर मदन याने शुर आम्ही सरदार हे शांताबाईंचे वीरश्री दाखवणारे गाणं सादर केलं. तर प्रज्ञा जोशी यांनी शारदास्तवन म्हणून जय शारदे वाघेश्वरी, ए आई बघना कसा हा दादा, प्रसिद्ध लावणी रेशमाच्या रेघांनी ही गाणी सादर करुन रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळवली. नीता टावरे यांनी शारद सुंदर चंदेरी राती, शालू हिरवा, ही गाणी सादर केली शालू हिरवा गाण्याला रसिकांनी चांगला प्रतिसाद दिला, अंजली घुगरे यांनी चांदणं टिपूर हालतो वारा, प्रसिद्ध नाट्यगीत काटा रुते कुणाला सादर करून सर्व रसिक प्रेक्षकांच्या अंगावर रोमांच काटा आणला, तर संस्थेचे अध्यक्ष सुधीर सिंगासने यांनी तोच चंद्रमा नभात, तर दाटून कंठ येतो या दोन्ही गाण्याला रसिकांनी चांगली दाद दिली. काही निवडक गाणी सादर करून शांता शेळके यांच्या गाण्यातील विविध भाव समोर आणले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सह कार्यवाह मिलिंद पळसुले यांनी केले. सूत्रसंचालन करताना शांता शेळके यांच्या प्रमुख गाजलेल्या गाण्याची तोंड ओळख करून देत, गाणी व त्यामागील प्रसंग सांगून शांता शेळके यांचा साहित्य प्रवास उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला. सर्व सहभागी कलाकार यांचा संस्थेच्यावतीने गुलाबपुष्प व पुस्तक भेट देऊन कार्यवाह किशोर नागवेकर यांनी सत्कार केला.

## उड्डाणपूल फलक अनावरण आणि अग्निशमन विभागाला दोन नवीन गाड्या

### महानगरपालिकेत भारतरत्न डॉक्टर ए.पी.जे अब्दुल कलाम जयंती साजरी



**भिवंडी: भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंतीचे औचित्य साधून पालिकेत आयोजित केलेल्या कार्यक्रमात महापौर प्रतिभा विलास पाटील यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

यावेळी पालिका आयुक्त सुधाकर देशमुख, उपमहापौर इम्रान वली मोहम्मद खान, स्थायी समिती सभापती संजय मात्रे, कोणार्क विकास आघाडीचे गटनेते विलास पाटील, नगरसेवक मलिक मोमीन, मुख्यालयाचे उपायुक्त दीपक पुजारी, शहर अभियंता लक्ष्मण गायकवाड, उपअभियंता संदीप सोमाणी, प्रभाग समिती क्रमांक एकचे सहाय्यक आयुक्त दिलीप खाने, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले अन्य अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर पालिकेत अग्निशमन विभागाकरिता दोन नवीन गाड्या खरेदी करण्यात आल्या त्या पालिकेच्या सेवेत दाखल झाल्या आहेत. या दोन नवीन अग्निशमन गाड्यांचे पूजन महापौर प्रतिभा विलास पाटील यांनी केले.

त्यानंतर बागे फिरदोस मशीद जवळील डॉक्टर ए.पी.जे अब्दुल कलाम उड्डाणपूल येथे नव्याने बसविण्यात आलेल्या नामफलकाचे अनावरण महापौर प्रतिभा विलास पाटील, आयुक्त सुधाकर देशमुख, उपमहापौर इम्रान वली मोहमद खान यांच्या हस्ते पार पडले. गेल्यावर्षी याच दिवशी या पुलाचा नामकरण सोहळा झाला होता. मात्र नामफलकाचे उद्घाटन नुकतेच महापौर प्रतिभा पाटील यांनी केले.

## मैत्रिणीसोबत कारमधून जाणाऱ्या तरुणावर हल्ला करून लुटणारे गजाआड

**भिवंडी: मैत्रिणीसोबत कारमधून जाणाऱ्या तरुणावर अचानक जीवघेणा हल्ला करून त्याच्या व मैत्रिणीकडील मोबाईल व सोन्याचे दागिने घेऊन फरार झालेल्या चोरट्यांना कोनगाव पोलिसांनी गजाआड केले आहे.**

अब्दुल कादिर अबरार शेख (24) रा. मोईवाडा, कल्याण, उमर अब्दुल रहेमान मन्सुरी (24), रा. गोविंदवाडी, कल्याण, निहाल नजीर शेख (23) रा. गोविंदवाडी, कल्याण अशी अटक केलेल्या लुटारुंची नावे आहेत. या चोरट्यांकडून चोरीचा मुद्देमाल घेणाऱ्या दोघांनाही अटक केली आहे. आकाश राजेश कंडारे (24), सलमान उर्फ नजीब मस्जीद शेख (27) असे चोरीचा मुद्देमाल विकत घेणाऱ्या अटक आरोपींची नावे आहेत.

ठाणे शहरातील पाचपाखाडी भागात राहणारे दर्शिल गुढका (27) हा त्याच्या मैत्रिणीसोबत 12 ऑक्टोबरच्या मध्यरात्री चारचाकी वाहनाने जलवाहिनीच्या रस्त्याने डोगराळीकडून घरी ठाणे येथे जात होते. त्यावेळी अचानक रेल्वे पुलाखाली अनोळखी तिघांनी त्याच्या कारसमोरच दुचाकी आडवी लावून उभी केली. विचारपूस करण्यासाठी दर्शिल कारमधून बाहेर पडताच तिघांनी त्याचा मोबाईल हिसकावला तसेच मैत्रीणीकडीलही मोबाईल, तिच्या गळ्यातील सोन्याची चेन व हातातील सोन्याची अंगठी, असा एकूण 83 हजार रुपयांचा मुद्देमाल जबरीने काढून घेतला. त्यावेळी दर्शिलने चोरट्यासोबत प्रतिकार केला असता त्याच्या डोक्यात लाकडी दांडक्याने जोरदार प्रहार करून मुद्देमाल घेऊन घटनस्थळावरून फरार झाले. तर चोरट्यांच्या हल्ल्यात दर्शिल याला गंभीर दुखापत झाल्याने त्याच्यावर ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

या प्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. मात्र, या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. तीन पोलीस पथकाने शोध घेऊन आरोपीसह मुद्देमाल केला हस्तगत चोरट्यांनी गुन्हा करताना निर्जनस्थळ व रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन केला होता. त्यामुळे पोलिसांकडे हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी कुठलाही सुगावा नसल्याने पोलिसांसोर मोठे आव्हान होते. या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी तीन पोलीस पथके नेमली होती.

त्यांनतर पोलीस तपासात, खबऱ्याकडून मिळालेली माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे गुन्ह्यातील अब्दुल कादीर अबरार शेख, उमर अब्दुल रहेमान मन्सुरी, निहाल नजीर शेख यांना कल्याणमधून ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता तिघांनीही गुन्हा केल्याचे कबूल केले. मात्र, लुटमारीतील मुद्देमाल इतर दोघांना विक्री केल्याने मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी पोलिसांनी सापळा रचून आकाश राजेश कंडारे आणि सलमान उर्फ नजीब मस्जीद शेख या दोघांनाही अटक करुन त्यांच्याकडून चोरीचा विकत घेतलेला मुद्देमाल जप्त केला. तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकीही जप्त केली आहे. गुन्ह्याच्या प्रकरणी अटक केलेल्या पाचही आरोपींचा कोनगाव पोलिसांनी अधिक तपास केला असता, आरोपी हे सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात समोर आले. आरोपी अब्दुल कादिर अबरार शेख 3 गंभीर गुन्हे, उमर अब्दुल रहेमान मन्सुरी 3 गुन्हे , निहाल नजीर शेख 14 गुन्हे आणि चोरीचा मुद्देमाल विकत घेणाऱ्या आकाशवर तब्बल 14 गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी दिली. सहायक पोलीस निरीक्षक किरणकुमार वाघ आणि गुहे प्रकटीकरण पथकातील पोलीस उपनिरीक्षक पराग भाट यांच्यासह पथकाने कामगिरी बजावली आहे.

## वीटभट्टी व्यवसायाला आधुनिकतेची जोड आवश्यक

भिवंडी: ठाणे पालघर जिल्ह्यात शेतीसाठी पूरक व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या वीटभट्टी व्यवसायाला आधुनिकतेची जोड देत तो कायदेशीर करण्याचा प्रयत्न सर्व शेतकऱ्यांनी करावा जेणे करून या व्यवसायावर अवलंबून शेतकरी व्यवसायिकांना भविष्यात कोणत्याही संकटांचा सामना करावा लागणार नाही, असा निर्णय नुकताच भिवंडी येथे कोकण विभागीय विट उत्पादक मालक संघटनेच्या बैठकीत घेण्यात आला.

याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष कुंदन पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या वीटभट्टी मालकांच्या बैठकीत मोठ्या संख्येने वीटभट्टी मालक उपस्थित होते.

वीटभट्टी मालकांना अवकाळी पावसासह स्थलांतरीत मजूरांकडून केल्या जाणाऱ्या तक्रारी, महसूल विभागा कडून केल्या जाणाऱ्या कारवाया यामुळे वीटभट्टी चालक बेजार झाले आहेत. यासाठी वीटभट्टी मालकांनी आपला व्यवसाय आधुनिकतेची जोड देत पारदर्शक व्यवहार करण्याची वेळ आली आहे, या बाबत सर्व उपस्थितांचे एकमत झाले. मजुरांचे श्रमिक कार्ड बनवून त्यांची नोंद कामगार कार्यालयात करणे ,वीटभट्टी मालक जसे भूमिपुत्र व्यवसायिक आहोत तसेच मजूर हे सुध्दा आपल्या ठाणे पालघर जिल्ह्यातील भूमिपुत्र आदिवासी बांधव आहेत या भावनेतून मजुरांशी सुध्दा आपण प्रेमाचे संबंध ठेवणे, वीटभट्टी व्यवसायाला आधुनिकतेची जोड देत कामगारांचे हित जपत पुढे जाण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे. या बैठकीत भिवंडी तालुक्यातील सुमारे दोनशे वीटभट्टी मालक उपस्थित होते ज्यांनी विचारलेल्या प्रश्नांना संघटनेच्या माध्यमातून उत्तर देत त्यांचे समाधान करण्यात आले.

## काँग्रेसचे नगरसेवक कामूर्ती यांचे नगरसेवक पद रद्द करण्याचा ठराव मंजूर

**भिवंडी : भिवंडी शहर महापालिका व नगरसेवकांची प्रतिमा खराब करणारे काँग्रेस पक्षाचे स्वीकृत नगरसेवक सिद्धेश्वर कामुर्ती यांचे नगरसेवक पद रद्द करण्यात यावे, अशी मागणी भिवंडी पालिकेच्या आयोजित करण्यात आलेल्या विशेष महासभेत नगरसेवकांकडून करण्यात आली.**

पालिकेचे काँग्रेस पक्षाचे स्वीकृत नगरसेवक सिद्धेश्वर कामुर्ती यांनी शहरातील पद्मानगर येथील भाजीपाला मार्केट येथे रस्ता रुंदीकरणात गेलेल्या दुकानदारांनी नव्याने 100 दुकाने अनधिकृतपणे बांधली आहेत. ते तोडण्यासाठी महापालिकेकडे तक्रार अर्ज केला होता. अर्ज मागे घेण्यासाठी दुकानदारांकडे यांच्याकडे दोन कोटी रुपये व फार्म हाऊसची मागणी केली होती. त्यामुळे सर्व दुकानदार घाबरले होते. त्यांनी विनंत्या करून सुध्दा कामुर्ती यांनी पैशासाठी तगादा लावला. त्यामुळे नाईलाजाने तक्रारदार यांनी ठाणे लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे तक्रार केली.

या बाबत संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व माहिती व पडताळणी केल्यानंतर 50 लाख रुपयांची लाच घेताना कामुर्ती यांना मागील आठवड्यात पोलिसांनी अटक केली आहे. या गंभीर प्रकारामुळे महापालिका व नगरसेवकांची प्रतिमा मलीन झाली आहे. महापालिकेच्या आयोजित करण्यात आलेल्या विशेष महासभेत महापालिकेचे कोणार्क विकास आघाडीचे गटनेते विलास पाटील, संतोष शेट्टी, उपमहापौर इमरान खान संजय म्हात्रे यांच्यासह सभागृहातील नगरसेवकांनी या प्रकरणी तातडीने काँग्रेस पक्षाचे नगरसेवक कामुर्ती यांचे मुंबई महापालिका अधिनियम10 प्रमाणे नगरसेवक पद रद्द करण्यात यावे, अशी मागणी महापौर प्रतिभा पाटील, आयुक्त सुधाकर देशमुख यांच्याकडे केली. त्यास अनुसरुन महापौर पाटील यांनी हा ठराव मंजूर करण्यात आल्याचे जाहीर केले. आयुक्त देशमुख यांनी पद रद्द करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल, असे सांगितले. शहरातील नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे.

## खांडपे गावात आरोग्य उपक्रम राबवून वाढदिवस साजरा



भिवंडी: भिवंडी तालुक्यातील खांडपे गावात शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेले सोमनाथ पाटील यांचा वाढदिवस गावात विविध उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.

या निमित्ताने नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबीर, नेत्र चिकित्सा शिबीर तसेच ई-श्रमिक व पॅन कार्ड शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सोमनाथ पाटील अनेक वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान देऊन परिसरात विविध उपक्रम राबवत आहेत. साई पिंपळेश्वर ट्रस्टच्या माध्यमातून आयोजित नेत्र चिकित्सा शिबीराचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.

यावेळी युवासेना जिल्हा प्रमुख प्रभुदास नाईक, उपसरपंच ज्ञानेश्वर पाटील, युवासेना विभाग अध्यक्ष प्रेमनाथ पाटील, ग्रा.पं.सदस्य विनोद तारे, अनंता पाटील, शरद पाटील, निखील तारे, चेतन पाटील, कमला बाई, लक्ष्मण दळवी, दिपक पाटील, प्रथमेश पाटील, प्रदीप तारे आदी उपस्थित होते. उपस्थित पाहुणे आणि शाळेतील लहान मुलांसोबत शिक्षण महर्षी सोमनाथ पाटील यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रशांत भोसल यांनी केले.

# स्वच्छतेच्या कामात कुचराई केल्यास खपवून घेतले जाणार नाही

## महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे पालिका अधिकाऱ्यांना निर्देश



कल्याण : शहराची प्रतिमा शहराच्या स्वच्छतेवर प्रथमत: अवलंबुन असते त्यामुळे स्वच्छतेच्या कामाबाबत कुचराई केल्यास खपवून घेतले जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, उप अभियंता, घनकचरा व्यवस्थापन, मुख्य आरोग्य निरिक्षक, आरोग्य निरिक्षक, शिक्षण विस्तार अधिकारी व स्वच्छतेसाठी महापालिकेस मदत करणारा शिक्षक वर्ग यांचे समवेत घेतलेल्या आढावा बैठकीत दिले.

कोविडच्या तीव्र लाटेत स्वच्छतेबाबत चांगले काम झाले, ते आताही व्हायला हवे, कचरा शहरात दिसता कामा नये, कारण शहर स्वच्छ असावे ही नागरिकांची माफक अपेक्षा आहे.त्यामुळे कचरा करणा-या फेरीवाले, दुकानदार यांच्यावर दंडात्मक कारवाई करा, असेही निर्देश त्यांनी या बैठकीत दिले.

25 मे, 2020 पासून "शुन्य कचरा मोहिम" महापालिकेने सुरु केली, परंतू वारंवार कचरा पडणारी ठिकाणे अदयापही काही ठिकाणी आहे. त्यामुळे प्रत्येक मुख्य आरोग्य निरिक्षक, आरोग्य निरिक्षक यांनी 2 GVP आणि शिक्षकांनी 1 GVP ची नियमित पाहणी करुन ते बंद होतील अशा उपाययोजना कराव्यात, अशा सुचना त्यांनी यावेळी दिल्या. घकव्य चे उपआयुक्त रामदास कोकरे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देवून काही शिक्षक कचरा पडताळणी कामी पुढे सरसावले. शिक्षकांकडे समाजाचे मत परिवर्तनाची, लोकांना पटवून देण्याची चांगली क्षमता असते त्यामुळे शिक्षकवर्गाची याकामी खुप मदत झाली, या शब्दात त्यांचे आयुक्तांनी विशेष कौतुक केले. सार्वजनिक शौचालयाच्या स्वच्छतेकडेही लक्ष दयावे, अशा सुचना आयुक्तांनी बैठकीत उपस्थित असलेल्या मुख्य आरोग्य निरिक्षक/आरोग्य निरिक्षक यांना दिल्या.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार दि. 25 ते 31 ऑक्टोबर दरम्यान राबविल्या जाणा-या "विशेष स्वच्छता सप्ताहात" घकव्य विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे यांनी काटेकोरपणे पूर्ण नियोजन करावे, असे निर्देश महापालिका आयुक्तांनी यावेळी दिले.

# राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसने दिला मोदींना महागाईचा चषक भेट

## कल्याणमध्ये राष्ट्रवादीचा तहसीलदार कार्यालयावर धडक मोर्चा




**कल्याण : इंधनदरवाढीबाबत वारंवार निवेदने देऊन देखील केंद्र सरकारला कोणताही फरक पडत नसल्याने अखेर आज राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसने इंधनदरवाढीच्या निषेधार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदींना महागाईचा चषक भेट दिला आहे. महागाईच्या विरोधात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी आक्रमक झाली असून कल्याणमध्ये राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधीर पाटील यांच्या नेत्तृत्वाखाली तहसीलदार कार्यालयावर धडक मोर्चा काढत आपला निषेध व्यक्त केला आहे.**

यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष वंडार पाटील, महिला जिल्हाध्यक्षा सारिका गायकवाड, प्रकाश तरे, संदीप देसाई, योगेश माळी, श्याम आवारे, प्रशांत नगरकर आदी पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले होते.

वाढती महागाई कमी करण्याचे आश्वासन देऊन केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेत आले. मात्र मोदी सरकार सत्तेत आल्यापासून महागाई कमी होण्याऐवजी पेट्रोल, डीझेल, गॅस सिलेंडर यांचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या दरांनी शंभरी पार केली असून घरगुती गॅस सिलेंडर देखील एक हजारच्या घरात पोहोचले आहे. या सर्वामुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे चांगलेच मोडले असून वाढत्या महागाईत घर कसे चालवावे हा प्रश्न गृहिणींना पडला आहे. त्यातच गेल्या दोन वर्षांपासून लॉकडाऊनमुळे अनेकांचे रोजगार बंद असून कोरोना आणि महागाई यामुळे जनता त्रस्त झाली आहे.

या सर्व गोष्टींचा निषेध म्हणून कल्याणमध्ये राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधीर पाटील यांच्या नेत्तृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. कल्याण पश्चिमेतील राष्ट्रवादी जिल्हा मध्यवर्ती कार्यालय येथून निघालेला हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्टेशन रोड येथून तहसीलदार कार्यालयावर धडकला. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी तहसीलदार कार्यालया बाहेर ठिय्या मांडत केंद्र सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेट देण्यासाठी तहसीलदारांना महागाईचा चषक देण्यात आला.

# विविध मागण्यांसाठी 'आशा' सेविकांचा कडोंमपावर मोर्चा



**कल्याण: विविध मागण्यांसाठी गट प्रवर्तक व आशा सेविकांनी कल्याण-डोंबिवली महापालिकेवर धडक देत मोर्चा काढला.**

महाराष्ट्र राज्य गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका संघाच्या माध्यमातून हा मोर्चा काढत शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या विविध थकीत रक्कमा त्वरित देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत महानगरपालिकेत काम करणाऱ्या आशा स्वयंसेविकांना केंद्र सरकारकडून देण्यात येणारे माहिती अहवाल अचूक संकलनाचे दरमहा दोन हजार रुपये एप्रिल 2029 पासुन दिले गेले नाहीत, ते त्वरीत देण्यात यावेत. राज्य सरकारने 17 जुलै 20 च्या शासन आदेशानुसार गटप्रवर्तकांना तीन हजार रुपये व आशा स्वयसेविकांना दोन हजार रुपये मानधनवाढ केली आहे. रक्कम मार्च 2021पर्यंत देण्यात आली आहे. एप्रिल 2021 पासून ही मानधनवाढ आजपर्यंत दिली नाही. ती ताबडतोबीने देण्यात यावी. राज्य सरकारने 9 सप्टेंबर 2021 च्या शासन आदेशानुसार 1 जुलै 2021 पासून गटप्रवर्तकांच्या मानधनात बाराशे रुपये व आशा स्वयंसेविकांच्या मानधनात एक हजार रुपये वाढ केली आहे. कोरोना महामारी असेपर्यंत गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांना दरमहा 500 रुपये कोरोना भत्ता देण्याचे मान्य केले आहे.

ही रक्कम गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांना ताबडतोब देण्यात यावी, आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना मागील वर्षी दिवाळी भाऊबीज दोन हजार रुपये महानगरपालिकेने जाहीर केले होते, ती रक्कम आजपर्यंत देण्यात आली नाही. ही रक्कमही आशा स्वयंसेविकांना यावर्षी देण्यात यावी व या दिवाळीला गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांना 10 हजार रुपये दिवाळी भाऊबीज (बोनस) देण्यात यावे.

तसेच मोबाईल रिचार्जचे पैसे गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांना दिले गेले नाही, ते थकबाकीसह देण्यात यावे. आशा स्वयंसेविकांना ज्या कामाचा मोबदला नाही, ते काम सांगू नये किंवा मोबदल्याविना काम देऊ नये. या व इतर मागण्यांसाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेवर मोर्चा काढला असल्याचे संघटनेचे उपाध्यक्ष भगवान दवणे यांनी सांगितले.

# रामनारायण रुईयाचा जागतिक पर्यटन दिन ऑनलाइन साजरा

**मुंबई: रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयांतर्गत रुईया बी. वोक टुरिजम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट विभाग यांनी आयोजित केलेला "जागतिक पर्यटन दिन 2021" हा कार्यक्रम 27 सप्टेंबर ते 7 ऑक्टोबर या कालावधीत पार पडला.**



जागतिक पर्यटन दिन' हा कार्यक्रम दरवर्षी युएनडब्ल्यूटीओ या आंतराष्ट्रीय संस्थेने प्रदान केलेल्या संकल्पनेवर साजरा केला जातो. या वर्षी देखील युएनडब्ल्यूटीओने 'पर्यटना बरोबर समावेशक वाढ' या संकल्पनेला महत्त्व आणि स्वीकृती दिली. सर्वांना सामावून घेणे म्हणजेच समाजात समान स्थान, दर्जा व आर्थिक संधी समान असणे. रुईया मधील "टुरिजम अँड इन्कलुसिव्ह ग्रोथ: एम्ब्रेसिंग द वॉइसेस ऑफ डायव्हर्सिटी" हा सोहळा पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने व फार उत्साहाने साजरा करण्यात आला.

स्वस्तात मस्त पर्यटन या पूर्व कार्यक्रमापासून सुरुवात करत अर्चना सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पर्यटक उत्सुकांना आर्थिकदृष्ट्या वाजवी (बजेट-फ्रेंड्ली) पर्यटन करण्याच्या ट्रिप्स आणि युक्त्या सांगितल्या गेल्या. डिंकल प्रसाद आणि अर्चना सिंग यांच्या नियंत्रणाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास भरघोस प्रतिसाद मिळाला.

त्या नंतर रुईया बी.वोक टुरिजम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांसाठी खास योजिलेले 'झेन आर्ट' वर्कशॉप 1 ऑक्टोबर 2021 रोजी पार पडले. या कार्यक्रमामध्ये रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयाने 'पायमा' संस्थेसोबत 'नंदिनी बन्सल' यांच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना एक वेगळ्या प्रकारचे ध्यान शिकवले.

हे दोन्ही पूर्व कार्यक्रम पार पडल्यावर मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन 5 ऑक्टोबर रोजी आरती उपाध्याय यांच्या हस्ते झाले. उद्घाटनाबरोबरच 'रेड टॉक' हा कार्यक्रम सादर झाला. एलजीबीटीक्यू कार्यकर्त्या सोनल जियानी यांनी एलजीबीटीक्यू समाजाला पर्यटनामध्ये मिळणाऱ्या संधींबद्दल माहिती दिली.

वर्णभेदावर मात करत सर्वसमावेशक वाढीसाठी 'रंगीबेरंगी प्रवास अनुभव' हा इव्हेंट 6 ऑक्टोबर 2021 रोजी पार पडला. प्राध्यापक डॉ. अनु तारानाथ यांच्या मार्गदर्शनाखाली विविध वर्णातील माणसांना पर्यटन व्यवसायात काय संधी आहेत हे सादर करण्यात आले. स्वतःचे अनुभव सांगून त्यांनी या कार्यक्रमाची रंगत फार वाढवली.

7 ऑक्टोबर 2021 रोजी मृदूला द्विवेदी यांच्या स्वानुभवातून एक असा विषय मांडला गेला जो पर्यटनामध्ये असतो पण कधीच कोणाला दिसत नाही. 'स्थानिक पर्यटनातील एक अविभाज्य घटक' या विषयामध्ये आपण कुठेही पर्यटन करत असताना तिथल्या स्थानिक लोकांवर त्याचा कसा परिणाम होतो हे मांडले गेले. त्यानंतर रुईया बी.वोक टुरिजम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांसाठी खास सत्कार समारंभ आयोजित केला होता.

# समाजकार्य प्रशिक्षण कार्यशाळा



**ठाणे: अखिल भारतीय कला क्रीडा व सांस्कृतिक अकादमी, ठाणे, शक्ती सामाजिक संस्था आयोजित सक्षम महिला बाल विकास सामाजिक प्रशिक्षण-2021 मध्ये समाजकार्य प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन संकल्प इंग्लिश स्कूल येथे करण्यात आले होते.**

आजच्या युगात महिला सर्व गुणांमध्ये, कला कौशल्यांमध्ये व स्वरक्षण करण्यास सक्षम होण्यासाठी ही कार्यशाळा घेण्यात आली होती. सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यातील चार आठवडे सुरु असलेल्या कार्यशाळेत मान्यवरांचे उत्तम मार्गदर्शन महिलांना लाभले.

या कार्यशाळेत तीस महिलांचा सहभाग होता. मार्गदर्शक डॉ. प्रतिमा बोर्डे, एडवोकेट महेश भालेकर, मनिषा चव्हाण यांनी विविध प्रकारचे प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचा समारोप सोहळा 17 ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात लाठी काठी असोसिएशनच्या दिपाली साठे व बाळा साठे (क्रीडाशिक्षक) व त्यांच्या विद्यार्थिनींनी तलवारबाजी, दांडपट्टा व लाठी काठी खेळाच्या प्रात्यक्षिकाने केली. उपस्थित महिलांना ह्या खेळात सहभागी करून घेतले.

कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे सोनी शेट्टी (उपनिरीक्षक वर्तक नगर पोलीस स्टेशन) यांनी महिलांनी उपयुक्त मार्गदर्शन केले तसेच अखिल भारतीय कला क्रीडा अकादमी, ठाणे च्या संस्थापिका साक्षी परब यांनी स्वसंरक्षणासाठी कराटे व मानसिक स्वास्थ्य टिकवून सशक्त होण्यासाठी योगाचे प्रशिक्षणही घेतले पाहिजे असे सांगितले. डॉ. ज्योती परब यांनीही महिलांना प्रोत्साहित केले.

अशाप्रकारे मान्यवरांच्या अमुल्य मार्गदर्शनाने हा समारोपाचा कार्यक्रम पार पडला. उपस्थित मान्यवर दिपाली साठे, बाळा साठे सर तसेच त्यांच्या विद्यार्थिनी व कार्यशाळेत उपस्थित सर्व महिलांना मान्यवरांतर्फे सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वयमचे राजेंद्र गोसावी यांनी केले. समारोपाच्या या कार्यक्रमात संकल्प इंग्लिश स्कूलचे संस्थापक डॉ. राज परब सर, शक्ती सामाजिक संस्थेच्या संध्या म्हसकर, संजय म्हसकर, एडवोकेट महेश भालेराव व साईसंकल्प पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रुची पारकर उपस्थित होत्या.

# महाग पेट्रोल घेणाऱ्या वाहनधारकांचा केला सत्कार



## राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे अनोखे आंदोलन

ठाणे: दिवसेंदिवस इंधनाचे दर वाढतच चालले आहेत. बुधवारी ठाण्यात पेट्रोलचे दर 112 रुपयांवर गेले आहेत. त्याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने अनोखे आंदोलन करण्यात आले. महागाईतही इंधन भरणाऱ्या वाहनधारकांचा पेट्रोल पंपावरच राष्ट्रवादीच्या युवा कार्यकर्त्यांनी सत्कार केला.

इंधनाचे दर गगनाला भिडले आहेत. इंधन दरवाढ मागे घेण्यासाठी केंद्र सरकारकडून कोणत्याही उपाययोजना केल्या जात नाहीत. याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ठाण्यातील तीन पेट्रोलपंप येथे इंधन भरणाऱ्या वाहनधारकांना चक्क गुलाबपुष्प देऊन तसेच त्यांना मिठाई भरवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

या आंदोलनात अभिषेक पुसाळकर दिनेश बने, वैभव विचारे, श्रीकांत भोईर, संदीप येताळ, आराफत खानबंदे, निखिल तांबे, विजय यादव, रवी गलाटे, के.पी. आहाद, विषयांत गायकवाड, नासिर शेख, मुझफ्फर मुल्ला, संतोष मोरे , साहिल मिलिंद बनकर, श्रावण भोसले, शिवम नाईक, तुषार धात्रक, आकाश पगारे, सिद्दी शेख, संजय साळुंखे, दिलीप उपाडे, वसीम खान, समीर नेटके, ज्ञानेश्वर राजपनखे, कुणाल भोईर, आशिष वाघ, अजिंक्य खंदारे, शशांक शिंदे आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.


